# वाशिम जिल्ह्यातील दुसरी घटना, अट्टल गुन्हेगार सुखदेव चव्हाण याचे टोळी विरुध्द मोकोका नूसार गुन्हा दाखल करण्यात आला दि. ११/०४/२०२०

# अट्टल गुन्हेगार टोळीविरुध्द मोक्का

## ❖ जिल्ह्यातील दुसरी घटना
## ❖ सुखदेव चव्हाण व त्याच्या ४ साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल




**वाशिम** ■ शहर प्रतिनिधी

गत १० वर्षात जिल्ह्यात व लगतच्या अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यात गुन्हेगार टोळीप्रमुख सुखदेव पंडीत चव्हाण ह्याने नवनवीन आरोपींना सोबत घेवून मोठ्या प्रमाणात जास्त शिक्षा असलेले गुन्हे केले आहेत. ही बाब वाशिम पोलीसांना एका फिर्यादीने दिलेल्या प्रकरणाचा तपास करतांना उघड झाली. त्यामुळे मानोरा पोलीसांनी सुखदेव चव्हाण व त्याच्या टोळीविरुध्द कलम ४२०, ३९५,५०६ भादंविनुसार गुन्हा दाखल करुन गुन्ह्यातील कलम ३(१) (आयआय),३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ अन्वये प्रस्ताव तयार करुन विशेष पोलीस महानिरिक्षक, अमरावती यांच्याकडे पाठवला होता. या प्रस्तावास विशेष पोलीस महानिरिक्षक यांनी मंजुरात दिली असून, सुखदेव चव्हाण व अन्य ४ जणांविरुध्द मोक्का (मोकका) लावला आहे. जिल्ह्यात मोक्का कायद्यांतर्गत दुसरी कारवाई करण्यात आली. यापुर्वी सुध्दा कुख्यात गुंड संतोष ठोके व त्याचे टोळीवर मकोका कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली होती.

या प्रकरणाबाबत सविस्तर माहीती अशी की, मानोरा पोलीस स्टेशन येथे १६ जानेवारी रोजी फिर्यादी धरमराज लक्ष्मणप्रसाद कोली वय ३२ वर्ष रा. चंदेरी ता. चंदेरी जि. अशोकनगर ह.मु. बाजारगाव कोंडाली जि. नागपूर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ते त्यांचे मुळगाव चंदेरी येथे लग्नाकरिता गेले असता तेथे त्यांच्या मामाच्या दुकानावर आरोपी विनोद मोहीत रा. धामनगाव वाठोडा जि. वर्धा हा भेटला व फिर्यादीने त्याला सांगितले की, त्यांची बहीण पूजा कोली हिचे लग्नाला ५ वर्ष झाले असून, तिला अजुनपर्यंत मुल झालेले नाही. त्यावरुन आरोपी विनोद मोहीते याने फिर्यादीस सांगितले की, माहूर येथील देविचे मंदिरातील एक बाबा मुल होण्याचे औषध देतात, असे सांगुन त्याने आरोपी सचिन जाधव याचा मोबाईल नंबर देवून त्यावर फोन करायला सांगितले. त्यावरुन फिर्यादीने १५ जानेवारी रोजी सदर क्रमांकावर फोन केला असता त्यावरुन सचिन जाधव रा. कारंजा लाड याने ३ महिन्याचे औषधाचे ७० हजार रुपये खर्च सांगुन, औषध घ्यायला माहूर देविचे मंदिरात येण्यास सांगितले. त्यामुळे १६ जानेवारी रोजी फिर्यादी हे त्यांची पत्नी, बहीण व बहीणीचे पतीसह माहूर देवीचे मंदिर येथे जायला निघून आरोपी सचिन जाधव याला फोन केला असता त्याने दिग्रस येथे येण्यास सांगितले. त्यानंतर दिग्रस येथून मानोरा येथे लाल माती, कॉलेज रोडवर बोलाविले. फिर्यादी हा त्याचे पत्नीसह नमुद इसमाचे गाडीजवळ जावून सदर इसमास औषधीसाठी ७० हजार देवून औषध मागितले. तेव्हा मागुन झायलो गाडीमध्ये गुन्हेगार टोळीचा मुख्य सुत्रधार सुखदेव पंडीत चव्हाण रा. धानोरा भुसे व टोळीतील इतर सदस्य अजय गजानन चव्हाण रा. कारंजा लाड, विनोद मोहीते रा. धामनगाव वाठोडा जि. वर्धा, गजानन पंडीत चव्हाण रा. कारंजा लाड असे येवुन फिर्यादीचे पत्नीचे गळयातील मंगळसुत्र हिसकावून घेतले. त्यास फिर्यादीचे पत्नीने विरोध केला असता तिला आरोपीतांनी जिवे मारण्याची धमकी दिली. अशा प्रकारे टोळीप्रमुख सुखदेव चव्हाण व त्याचे साथीदारांनी स्वतःचे व टोळीतील सदस्यांचे आर्थिक फायद्यासाठी फिर्यादी जवळुन नगदी ७० हजार रुपये व त्यांचे पत्नीचे सोन्याचे ९ हजार रुपयांचे मगंळसुत्र असा एकुण ७९ हजार रुपयांचा माल जबरीने हिसकावून झायलो गाडीने पळून गेले. अशा फिर्यादीचे रिपोर्टवरुन गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

सदर गुन्ह्याचे तपासात असे निष्पन्न झाले की, टोळीप्रमुख सुखदेव पंडीत चव्हाण हा गुन्ह्यातील आरोपी व इतर नवनवीन आरोपीसोबत मिळुन स्वतःचे व टोळीतील सदस्यांचे आर्थिक फायद्यासाठी व टोळीचे वर्चस्व गाजविण्यासाठी गुन्हे करीत असून, मागील १० वर्षात अकोला जिल्हा, यवतमाळ जिल्हा व वाशिम जिल्ह्यात तीन वर्ष व त्यापेक्षा जास्त शिक्षा असलेले गुन्हे केलेले असून, न्यायालयाने सुध्दा त्या गुन्ह्यांची दखल घेतल्याचे निष्पन्न झाले असल्याने टोळीप्रमुख सुखदेव पंडीत व टोळीतील सदस्य यांचेविरुध्द मानोरा पोलीस स्टेशनमध्ये कलम ४२०, ३९५, ५०६ भा.दं.वि.चे गुन्ह्यात कलम ३(१)(ii), ३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ अन्वये वाढ करणेबाबत प्रस्ताव तयार करुन विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी लेखी मंजूरी दिल्याने सदर गुन्ह्यातील आरोपी टोळीप्रमुख नामे सुखदेव पंडीत चव्हाण वय ६० वर्ष रा. धानोरा भुसे ता. मानोरा, सचिन धनराज जाधव वय २५ वर्ष रा. गौतमनगर कारंजा लाड, अजय गजानन चव्हाण वय २५ वर्ष रा. गौतमनगर कारंजा लाड, विनोद भरत मोहीते वय २५ वर्ष रा. धामनगाव वाठोडा, ता.जि. वर्धा व गजानन पंडीत चव्हाण वय ५० वर्ष रा. गौतमनगर कारंजा लाड यांचेविरुध्द सदर गुन्ह्यात कलम ३(१)(ii), ३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ अन्वये मकोका लावण्यात आला असून, गुन्ह्याचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पाटील हे करीत आहेत.

■ सदर टोळीप्रमुख सुखदेव पंडीत चव्हाण व त्याचे इतर साथीदाराविरुध्द लगतचे अकोला, यवतमाळ व जिल्ह्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याने पोलीस अधिक्षक परदेशी यांनी मानोरा पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्ह्याचा बारकाईने तपास करण्याबाबत तसेच लगतच्या जिल्ह्यात दाखल असलेल्या गुन्ह्यांची माहीती प्राप्त करुन प्रभावी कारवाई करण्याचे आदेश निर्गमित केले. त्या अनुषंगाने अतिरक्त पोलीस अधिक्षक विजयकुमार चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी, संजय पाटील, मानोरा ठाणेदार शिषीर मानकर,पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हेशाखा शिवाजी ठाकरे, सपोनि अतुल मोहनकर, पोउपनि योगेश रंधे यांनी अहोरात्र मेहनत घेवून गुन्हेगाराचे संबंधित जिल्ह्यातील पोलीस स्टेशनकडून रेकॉर्ड हस्तगत करुन प्रस्ताव वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर केला. त्यामुळे वरिष्ठांनी सदर गुन्ह्यात मकोका कायद्यानव्ये कारवाई करण्याचे आदेश निर्गमित केले.

## गंभीर स्वरुपाच्या गुन्हेगारांची पोलीसांना माहीती द्या!

जिल्ह्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हेगार, अशा गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या व्यक्ती, गुन्हेगारांना मदत करणारे इतर गुन्हेगार यांचे वर्तनात बदल न झाल्यास अशा गुन्हेगार किंवा टोळीवर अशाच प्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल. याची गंभीर दखल ज्या व्यक्ती अशा टोळ्या चालवितात, त्यांना पाठबळ देतात. अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमांनी घ्यावी. तसेच जनतेनेही अशाप्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या व्यक्तींच्या टोळ्या बाबतची माहिती पो.नि. शिवा ठाकरे, स्थानिक गुन्हेशाखा तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना द्यावी, अशी माहीती देणाऱ्यांचे नाव गुप्त ठेवण्यात येईल, असे आवाहन पोलीस अधिक्षक वसंत परदेशी यांनी केले आहे.

ePaper देशोन्नती
Sat, 11 April 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/50851058